- अभीयाना अंतर्गत शहरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देउन रोजगाराची संधी उपलब्ध करण्याकरीता आवश्यक ती उपायोजना सदरहू घटकामार्फत केली जाते. यात ७५ % शहरी गरीब व २५ % इतर लाभार्थी असतील.कौशल्य विकासप्रशिक्षणाकरीता प्रशिक्षणाथीची निवड केंद्र शासनाने विहित केलेल्या निकष व अटींच्या अधीन राहूनकरणे आवश्यक आहे लाभार्थ्यांपैकी कमीत कमी ३० टक्के लाभार्थी महिला, १५ टक्केलाभाथी अल्पसंख्याक समाजातून व ३ टक्के लाभाथी अपंग प्रवर्गातून असणे आवश्यक राहील.लाभार्थ्यांची निवड, समुपदेशन, प्रशिक्षण पूर्व तयारी, प्रशिक्षण साहित्य , प्रशिक्षण मानधन, प्रमाणपत्र, अवजार संच, प्लेसमेंट व इतर अनुषंगिक खर्च इत्यादी बाबींवर अभियानांतर्गत रू. १५,०००/- प्रती प्रशिक्षणार्थी याप्रमाणे निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे.महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) व राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) यांचा कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अग्रणी संस्था म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

**उपांग क्र. ३ : वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय / FINA NCIA L INCLUSION A ND MICRO ENTERPRICES (FIME)**

- दिवसेंदिवस शहरातील लोकसंख्या वाढत असून शहरातील रोजगाराची समस्या सुद्धा वाढत आहे. ज्या प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे त्या प्रमाणात त्यांना नोकरी उपलब्ध करून देणे शक्य नाही. त्यामुळे शहरातील गरीब जनतेला स्वयंरोजगारकरीता प्रेरीत करणे व त्याचे उद्योग उभे करण्यास त्यांना मदत करणे हे या उपांगाचे उद्दिष्ट आहे.दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत शहरी गरीबांना उद्योजकतेबाबत प्रेरीत करण्यात येते व त्यांना व्यवसाय उभा करण्यासाठी बँकेमार्फत कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करण्यात येते. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना ७% व्याजदरावरबँकेमार्फत कर्ज दिल्या जाते व ७% वरील कर्ज दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत बँकेला दिल्या जाते व महिला बचतगटांनी घेतलेल्या कर्जाची त्यांनी विहित कालावधीत परतफेड केल्यास त्यांना प्रोत्साहन म्हणून व्याज दरातील रकमेत ३% अतिरीक्त सूट देण्यात येते.

स्वयंरोजगारा अंतर्गत येणारे घटक -

१. स्वयंरोजगार वैयक्तिक (SEP - I)
२. स्वयंरोजगार गट (SEP - G)
३. स्वयंरोजगार स्वयंसहायता गट (SEP - SHG Bank Linkage)

१. स्वयंरोजगार वैयक्तिक (SEP - I)
   a. लाभार्थी - कोणताही शहरी गरीब जो स्वजंत्रपणे (वैयक्तिकपणे)
   b. वय - किमान १८ वर्ष
   c. प्रकल्प किंमत - कमाल २ लाख रु.

२. स्वयंरोजगार गट (Gorup Entreprises) (SEP - G)

स्वयंसहायता गट किंवा गटाचे सदस्य एकत्र येऊन गट व्यवसाय (Gorup Entreprises) करण्याकरीता कमी व्याज दरात कर्ज बँकाकडून प्राप्त करुन घेऊ शकतील.

   a. लाभार्थी - गट व्यवसायाकरीता किमान ५ सदस्य हवेत, त्यातील किमान ७०% सदस्य दारिद्र्य रेषेखालील हवेत.
   b. वय - किमान १८ वर्ष
   c. प्रकल्प किंमत - कमाल १० लाख रु.

**व्याजावरील सूट देण्याची पद्धत :-**

- सर्व SCHEDULED COMMERCIAL BANKS (SCBs), REGIONAL RURAL BANKS (RRBs) AND COOPRATIVE BANKS, जे CORE BANKING SOLUTION (CBS) अंतर्गत काम करत आहे त्या राष्ट्रीय व राज्य नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत व्याजावरील सूट देण्यास पात्र आहे.
- लाभार्थ्याला कर्ज मिळाल्यानंतर संबंधित बँकेची शाखा दिलेल्या कर्जाची विस्तृत माहिती INTEREST SUBSIDY च्या रकमेसोबत नागरी संस्थेला कळवेल.
- बँक प्रत्येक महिन्याला अशी प्रकरणे नागरी संस्थेकडे सादर करावीत तसेच नागरी संस्थेनी व्याजावरील सुटीचे प्रकरणे दर तीन महिन्यांनी माहिती व्यवस्थित तपासून ७% वरील व्याज बँकेला द्यावे.

**स्वयंसहायता गटांतर्गत (SHG - BA NK LINKA GE):-**

- स्वयंसहायता गट राष्ट्रीय व राज्य नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थाबांधनी या घटकाअंतर्गत करण्यात येईल त्यांना फिरता निधी (RevolvingFund) व बँकेसोबत लिंकेज (बँकेत खाते उघडणे) सुद्धा याच घटकाअंतर्गत करण्यात येईल.
- स्वयंसहायता गटाला त्याच्या सेव्हिंग च्या प्रमाणात कर्ज मिळेल. (प्रमाण १:१ ते १:४)
- शहरी गरिबांच्या स्वयंसहायता गटांना कर्जाच्या ७% व्याजावरील व्याजावर सूट मिळेल.(७% वरील व्याज शासनामार्फत बँकांना दिल्या जाईल)
- स्त्रियांचे स्वयंसहायता गटांनि कर्जाची परतफेड योग्य वेळेत केली असेल तर त्यांना त्यांच्या कर्जाच्या व्याजावरती अधिक ३% सूट मिळेल (कर्जाची पूर्ण परतफेड झाल्यावर).

## उपांग क्र. ५ नागरी फेरीवाल्यांना सहाय्य (Sipport to Urban Street Vendors)

- दीनदयाळ अंत्योदय राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानअंतर्गत (DAY-NULM) नागरी फेरीवाल्यांचे बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्याचा विकास करुन त्यांच्या उपजिविकेचा दर्जा उंचावण्याचर भर दिला जाईल. त्याअनुषंगाने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांना ओळखपत्र देणे, शहर फेरीवाला आराखडा विकासीत करणे, फेरीवाला क्षेत्रांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास करणे, त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देवुन त्यांचा आर्थिक विकास करणे हे उपांगाचे उद्दिष्ट आहे. DAY-NULM अंतर्गत एकुण उपलब्ध तरजुदीच्या ५% एवढी रक्कम फेरीवाल्यांना सहाय्य या उपांगावर खर्च करणे अपेक्षित आहे.

१. विक्रीसाठी नागरी नियोजन (Pro-vending Urban Platform) शहर फेरीवाल्यांचे सामाजिक सामाजिक व आर्थिक (Socio economic) सर्वेक्षण करून त्याद्वारे फेरीवाल्यांचे नोंदणी करणे, ओळख पत्र देणे, डाटाबेस तयार करणे, विक्री साठी नागरी नियोजन करणे अपेक्षित आहे.
२. कार्य कौशल्याचा विकास आणि फेरीवाल्यांसाठी लघुव्यासाय सहाय्य (Skill Development and Enterprise Development Support) या अभियानांतर्गत असलेल्या कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता या उपांगाअंतर्गत फेरीवाल्यांना कौशल्ययुक्त प्रशिक्षण देणे.
३. फेरीवाल्यांना पत मिळविण्याच्या दृष्टीने संबंधित बँकांना भेट देणे व क्रेडीटकार्ड मिळवून देणे अपेक्षित आहे.
४. फेरीवाल्यांसाठी बाजारपेठांचा विकास (Devlopment of VendorMarkets):- या उपांगाअंतर्गत विक्री क्षेत्र, विक्री योजना व बाजारपेठा इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यावर भर देणे इत्यादी.
५. सामाजिक सुरक्षेची एक केंद्राभिमुखता (Social Security Convergence) :- या उपांगाअंतर्गत फेरीवाल्यांना केंद्र/राज्य शासनाकडीलसामाजिकसुरक्षितता लाभ, RSBY, व इतर योजनाचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणे व लाभ मिळविण्यास मदत करणे.

## उपांग क्र. ६ नागरी बेघरांना निवारी (Shelter for Urban Homeless)

- दीनदयाल उपाध्याय अंत्योदय.-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत बेघरांना निवारा (SUH) साठी अंतर्गत शहरी गरिबांसाठीशास्वत बदल घडवून आणणे. राष्ट्रीय नागरी गृहनिर्माण व आवास (NUHHP), धोरण २००७. ची

पार्श्वभूमी अशी की समाजातील सर्व स्तरातील गरिबांसाठी जमीन निवारा व इतर सेवा स्वस्तात उपलब्ध करून देणे. शहरी गरीब अनौपचारिक रित्या स्वस्तात मजूर म्हनून काम करतो. तरीही शहरी गरीब निवारा व इतर सामाजिक संरक्षणा पासून वंचित असतात. शहरी बेघर/गरीबा  ला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते जसे आरोग्य, शिक्षण,अन्न,पाणी आणि स्वच्छतेच्या बाबी.  राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत, नागरी बेघरांना निवारा या उपांगा अंतर्गत शहरी बेघरांनाप्राथमिकसोयी युक्त निवारे टप्या-टप्या ने उपलब्ध करणे असा आहे..

- नागरी बेघरांची संख्या ज्याठिकाणी आहे अशा ठिकाणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार निवारा उभारणेव सदर निवाऱ्यामध्येपाणी, स्वच्छता, लाईट, सुरक्षा,सुरक्षितता उपलब्ध करणे.
- नागरी गरिबबेघरांपैकी मुख्यत: लहान मुले, महिला,वयोवृद्धव्यक्ती,अपंग व्यक्ती, आजारी व्यक्तींना निवाऱ्याची सोय उपलब्ध करणे.
- संबंधिताना, सामाजिक सुरक्षितता, निवृत्ती वेतन व शासनाच्या इतरयोजनांचालाभ ही त्या अनुषंगाने उपलब्ध करणेअपेक्षित आहे.
- या पैकी काही निवारे असुरक्षित वर्ग जसे १) एकल माहिला/परित्यक्ता २) वयोवृद्ध  ३) अबोध बालके ४) अपंग ५) मानसिक रोगी इत्यादी करिता असावे.
- निवारा व्यवस्थापन करणे करिता निवारा व्यवस्थापन समिती (SMC) स्थापन करने अपेक्षित आहे.
- निवारा बांधकामाचा किंवा नूतनीकरणाचा आराखडा तयार करिता असताना प्रती व्यक्ती ५० स्क़े.फुट जागा येईल या प्रमाणात ५० ते १०० व्यक्ती करिता साठी असणे आवश्यक आहे.
- नागरी बेघरांना निवारा अंतर्गत निवाऱ्याचे देखभाल व व्यस्थापन करणे साठी ५ वर्ष शासन निधी उपलब्ध करून देणार असून तद्‌नंतर निवारा शास्वतसुरु राहावा यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.
- नविन निवारा बांधकाम, उपलब्ध असलेले जुने निवारे नुतनीकरण करणे व सर्व निवा-यांचे देखभाल व्यवस्थापन करणे कामी स्थानिक स्वराज्य संस्थांनी DPR (Detail Project Report) तयार करुन राज्य स्तरावरुन प्रकल्प मान्यता कडुन मंजुर करुन घेणे अपेक्षित आहे.

**NULM A  dministration अभियानाचे व्यवस्थापन**

या अभियानाचे व्यवस्थापन राष्ट्रीय, राज्य व स्थानिक अशा तीन स्तरावरुन करावयाची आहे. राज्यस्तरीय व्यवस्थापनासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली एका Governing Council राज्यस्तरीय अभिकरण तर मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली एका Executive Committee (कार्यकारी समिती) चे गठण करण्यात आलेली आहे. तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, हे या अभियानाचे राज्य अभियान संचालक म्हणून कामकाज पाहतील.

## (१.१२) राज्यातील नगरपरिषदांचा कर्मचारी आकृतीबंध

**०१.** राज्यातील नगरपरिषदांचे कामकाज गतीमान होण्यासाठी नगरपरिषदेच्या प्रशासनामधील प्रत्येक विभागामध्ये किमान शैक्षणिक अर्हताप्राप्त कमर्चारी वर्ग विशेषत: पर्यवेक्षकांची गरज आहे. वाढत्या नागरीकरणामुळे बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग घनकचरा व्यवस्थापन, नगररचना, दुहेरी नोंद लेखा पध्दती, लेखापरीक्षण व अग्निशमन विभाग या विभागांच्या सेवा सुरु करणे व अस्तित्वात असतील त्यांचे बळकटीकरण करणे अत्यावश्यक आहे.

**०२.** नगरपरिषदांमधील कामाचे सुसूत्रिकरण व्हावे आणि त्यांच्या सेवाशर्ती वेतनश्रेणी यांच्यात समानता असावी व विहीत शैक्षणिक अर्हतापात्र जबाबदार पर्यवेक्षक उपलब्ध व्हावेत म्हणून प्रत्येक नगरपरिषदेचा लोकसंख्येवर आधारित कर्मचारी आकृतीबंध या संचालनालयाकडून मंजूर केला जातो. तसेच पदांच्या जबाबदारीनुसार शैक्षणिक अर्हता विहीत केली जाते. मंजूर आकृतीबंधामुळे सर्व नगरपरिषदांनी शैक्षणिक अर्हताप्राप्त व सक्षम असा नवीन कर्मचारीवर्ग तर मिळेलच शिवाय सध्याच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. महागाई भत्ता वितरणाचे कामात सुसूत्रता येवून निधी वितरण तात्काळ करणे शक्य होणार आहे.

**०३.** नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक सेवा विभागाची कार्यक्षमता वाढून नगरपरिषद पुरवित असलेल्या नागरी सेवांचा दर्जा सुधारणार आहे. शासन राबवित असलेल्या अनेक योजना व त्या योजनेच्या अंतर्गत मिळणारा निधी याचा विनियोग कार्यक्षमतेने व गुणवत्तापूर्ण कामांच्या निमिर्तीत होणार आहे. पर्यायाने स्थानिक स्वराज्य संस्थेप्रती नागरीकांच्या असलेल्या दृष्टीकोनात फरक पडणार आहे.

**०४.** आज दिनांकापर्यंत सर्व नगरपरिषदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सन २००१ ची जनगणना विचारात घेवून सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. सदरचे आकृतीबंधास पुढील सूचना मिळेपर्यंत संचालनालयाचे परिपत्राक दि.५ जून, २०१० अन्वये मुदतवाढ देण्यांत आली आहे. सुधारीत आकृतीबंधाबाबतची कार्यवाही शासनाकडून सन २०११ चा जनगणनेनुसार वाडीव लोकसंख्या विचारात घेऊन व वर्ग बदल झालेल्या नगरपरिषदेचा आकृतीबंध सुधारीत करण्याबाबत प्रस्ताव नगर विकास विभागास सादर केला आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर नगरपरिषदेना (सर्व) याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या जातील.

**(१.१३) नवीन नगरपरिषद / नगरपंचायत यांचा शासन निर्णयानुसार आढावा.**

**०१.** शासन नगर विकास निर्णय दि.०५.०७.२०१६ अन्वये एकूण १०१ नवीन नगरपरिषद / नगरपंचायतीसाठी सहपत्र अ, ब व क नुसार पदे मंजूर केली आहेत. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.०६ मध्ये नव्याने निर्माण केलेली पदे पुढील प्रमाणे भरावयाची आहेत.

(१) ग्रामपंचायतीचे नगरपरिषद / नगरपंचायतीमध्ये रूपांतर करण्याबाबत प्राथमिक अधिसूचना निर्गमित करण्याच्या दिनांकापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीमध्ये नियमित स्वरूपात कार्यरत असणाऱ्या व नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये समावेश करण्यासाठी अर्हताप्राप्त ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या समावेशनाने.

(२) विभागीय क्षेत्रातील नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये मंजूर आकृतीबंधापेक्षा जास्त कार्यरत असलेल्या अतिरिक्त ठरलेल्या अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांच्या समावेशनाने.

(३) अस्तित्वात असलेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये रोजंदरी तत्वावर कार्यरत असणाऱ्या व समावेशनास अर्हताप्राप्त असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीने.

(४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अतिरिक्त असलेल्या पात्र उमेदवारांची नेमणूक करून भरण्यात येतील. मात्र सदरच्या प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर त्याअनुषंगाने आवश्यक आदेश निर्गमित केल्यानंतर एक महिन्याच्या आत जी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची यादी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून देण्यात येईल, त्या यादीतील पात्र उमेदवारांची नेमणूक करून पदे भरण्यात येतील.

(५) उपरोक्त अ.क्र.(१) ते (४) नुसार कार्यवाही करूनही रिक्त राहिलेली उर्वरीत नवनिर्मित पदे सरळसेवेने भरण्यात यावीत.

**(१.१४) अनियमित नेमणुकांबाबत.**

नगरपरिषदांच्या आस्थापनेवर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता वयोमर्यादेचा किंवा शैक्षणिक पात्रतेचा विचार न करता त्यांच्या स्वत:च्या अखत्यारीत मोठ्या प्रमाणावर नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

०१. दि.३०.०६.१९८६ पूर्वीच्या रोजंदारी व अनियमित नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांना मानवतावादी व सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून त्यांची झालेली सेवा व कामाचा अनुभव विचारात घेवून एक वेळची विशेष बाब म्हणून काही अटींच्या अधीन राहून नियमित करण्यात आलेल्या आहेत.

०२. विहित पध्दतीने नेमणूक झालेले कर्मचारी यांच्यावर अन्याय होवू नये म्हणून अनियमित नेमणूक केलेले कर्मचारी यांच्या सेवा विषयक लाभामध्ये फरक असणे आवश्यक असल्याने दि.१६.०५.२००५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**(१.१५) रोजंदारी नेमणुकांबाबत.**

०१.	दि.१०.०३.१९९३ पूर्वीचे रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याबाबत प्रादेशिक संचालकांना अधिकार प्रदान करण्यात आले.

०२.	सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक दि.२५.०८.२००५ व त्यात नमुद मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेवून दि.१०.०३.१९९३ ते दि.२७.०३.२००० या कालावधीतील नगरपरिषद आस्थापनेवरील कार्यरत असलेले अनियमित रोजंदारी कर्मचाऱ्यांना नगरपरिषद आस्थापनेवर नियमित सेवेत समावेशन करुन घेणे शक्य होणार नाही असे शासन नगर विकास विभागाने आपले पत्र दि.३०.११.२००५ अन्वये या संचालनालयास कळविले आहे.

**०३.**	दि.१०.०३.१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना एकवेळची विशेष बाब म्हणून नगरपरिषद नियमित सेवेत (अस्थायी आस्थापनेवर) सामावून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच नगरपरिषदांनी सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता केलेल्या कर्मचाऱ्यांच्या अनियमित नियुक्त्या नियमानुकुल करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा रोजंदारी / अनियमित कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्ति अनुज्ञेय नाही. याबाबत संचालनालय पत्र क्र.नप्रसई-१००४/प्र.क्र.१४/०४/५, दि.१६.०२.२००४ सर्व नगरपरिषदांना कळविण्यात आलेले आहे.

**(१.१६) सफाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देणेबाबत.**

**०१.**	लाड कमिटीच्या शिफारसीनुसार वारसास वारसा हक्काने नियुक्ती मिळणेकामी या संचालनालयाने तसेच शासनाने वेळोवेळी स्थायी निर्देश तसेच परिपत्रके निर्गमित केलेली आहेत. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक दि.११.०८.२००६ नुसार वारसा हक्काच्या रिक्त जागा भरण्यासाठी आस्थापना खर्चाच्या मर्यादेची अट काढून टाकली आहे. तसेच वारसा हक्कानुसार सेवेत समाविष्ट करताना वारसदाराच्या पात्रतेनुसार खालील व्यक्ती वारस म्हणून पात्र असतील :

१. पती / पत्नी
२. मुलगा /सून
३. अविवाहित मुलगी
४. विधवा / घटस्फोटीत मुलगी
५. विधवा / घटस्फोटीत बहीण
६. वरीलपैकी कोणताही वारस उपलब्ध नसल्यास त्याचा सांभाळ करण्याची लेखी हमी देणारी जवळची नातेवाईक किंवा नामनिर्देशित व्यक्ति.

**०२.**	नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील सफाई कामगारांच्या वारसांना स्थायी अथवा अस्थायी पदावर नियुक्ती देता येईल असे या संचालनालयाचे दि.२३.०९.२००५ चे परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे अस्थायी सफाई कामगाराचे पद निष्कासित होणार नाही.

**०३.**	शासन, नगर विकास विभाग यांचे दि.१०.०९.२००७ परिपत्रकानुसार वैद्यकिय कारणास्तव सफाई कर्मचारी विकलांग झाल्यास सफाई कर्मचाऱ्यांचे कर्तव्य पार पाडण्यास तो असमर्थ ठरल्यास त्याने २० वर्षे सेवा पूर्ण करणे ही अट जाचक आढळून आली आहे. सदर बाब विचारात घेवून २० वर्षे अर्हताकारी सेवेची अट वगळण्यात आली आहे. शासनाचे दि.१०.०९.२००७ चे परिपत्रकात घेतलेला निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू नसून परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू असलेबाबत संचालनालयाचे दि.२५.०५.२०१२ चे पत्रान्वये सर्व नगरपरिषदांना कळविले आहे.

**०४.**	वारसा हक्क नियुक्तीमध्ये विलंब टाळण्यासाठी संचालनालयाचे दि.२३.०५.२०१३ चे पत्रान्वये सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यांत आल्या आहेत.

**०५.**	लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे दि.२६.०२.२०१४ चे शासन परिपत्रकान्वये, सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणीचे अनुषंगाने सूचना निर्गमित केल्या आहेत. सदरहू दि.२६.०२.२०१४ चे परिपत्रकाची प्रत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांना पाठविण्यात येवून परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना त्यांचे स्तरावरून जिल्हा प्रकल्प अधिकारी व मुख्याधिकारी यांना देण्याबाबत संचालनालयाचे दि.२८.०३.२०१४ च्या पत्रान्वये कळविले आहे.

**०६.**	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याकडून शासनाच्या इतर विभागाच्या (नविवि, साप्रवि, कामगार, आरोग्य इ.) सहमतीने सर्वसमावेशक धोरण विहित करण्यात येणार आहे.

**(१.१७) न्यायालयीन प्रकरणे.**

**संचालनालय स्तरावर कार्यासन ६ कडे एकूण ७५० प्रकरणे आहेत. याबाबतची यादी तयार केली असून ती अदयावत करणे आवश्यक आहे**

**०१.** अनियमित / रोजंदारी/ कंत्राट पध्दतीवर / मानधनावर/ हंगामी पध्दतीने नगरपरिषदेने नेमलेल्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यासाठी संबधित कर्मचारी याचिका दाखल करत असतात. त्याच प्रमाणे नगरपरिषदेचे् कर्मचारी वेतनश्रेणी सुधारीत करण्याबाबत याचिका दाखल करत असतात. कर्मचा-यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक तत्वे स्थायी निदेश क्र.२१ व २९ मध्ये विहीत करण्यात आली आहेत. त्यानुसार नगरपरिषदेच्या कमर्चा-यांच्या न्यायालयीन प्रकरणामध्ये मुख्याधिकारी यांनी सक्षमपणे बाजू मांडण्याबाबत वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**०२.** मा.उच्च न्यायालय / मा.सर्वोच्च न्यायालयाने एखादया प्रकरणामध्ये (Specific order ) स्पष्ट निर्देश दिले असतील तर मुख्याधिकारी यांनी प्रकरणाची सर्व न्यायालयीन कागदपत्रे व संबंधित कर्मचा-याचे संचिकेसह संचालनालयामध्ये उपस्थित राहून वेळीच कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी अशा सुचना यापुर्वी संचालनालयाकडून देण्यात आलेल्या आहेत.

**०३.** मा.न्यायालयीन प्रकरणामध्ये वेळीच बाजू मांडली जात नाही. मा.न्यायालयीन प्रकरणात पाठपुरावा केला जात नाही. शासनाच्या / संचानलायाच्या धोरणाविरुध्द मा.न्यायालयाचे आदेश झाल्यास त्याविरुध्द अपिल दाखल केले जात नाही असे या संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे.

**०४.** विभागातील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा आढावा घेतला असता सोबतच्या यादीप्रमाणे मा.न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येते. सोबत यादीची हार्ड व सॉफ्ट कॉपी विभागिय आयुक्त कार्यालयास पाठविली आहे. सदरची यादी विभागिय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांच्या स्तरावर अदयावत करण्यात यावी. यादीमध्ये नसलेल्या परंतु नगरपरिषद स्तरावर चालू असलेले व ज्यामध्ये संचालनालय प्रतिवादी आहेत अशा प्रकरणाची स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी. याबाबत विभागिय स्तरावर मुख्याधिकारी यांच्या बैठकीमध्ये सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार विभागिय आयुक्त कार्यालयाने आढावा घेवून या संचालनालयास तात्काळ माहीती सादर करावी.

**(१.१८) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत**

अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना प्रामुख्याने रिक्त पदांचा अभाव व अवास्तव वाढलेला, मर्यादेत नसलेला आस्थापना खर्च या समस्या उद्भवतात.

१) शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एमसीओ-१२९६/१८८९/प्र.क्र.११५/९६/नवि-१४, दि.१६/१०/१९९७ अन्वये दि.१६/१०/१९९७ पासून शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३, दि.२६/१०/१९९४ अन्वये कार्यान्वीत करुन शासकीय कर्मचाऱ्यांना लागू केले ली अनुकंपा नियुक्ति योजना नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शासनाकडून लागू करण्यात आलेली आहे. सदरील शासन निर्णयानूसार नगपरिषद कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्तिसाठी नगरपरिषद आस्थापनेवर नवीन पदे निर्माण केली जाणार नाहीत व नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च नगरपरिषद उत्पन्नाच्या ४२ % पेक्षा जास्त होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे स्पष्ट करण्यात आले आहे.

२) संचालनालय स्थायी निदेश क्र.२३-अ, दि.१/८/२००६ मध्ये मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तिच्या अर्जांची शासन निर्णयानूसार छाननी करुन फक्त पात्र उमेदवारांचीच नियुक्ति करावयाची आहे. अनुकंपा तत्वाखाली धोरणात्मक बाब / निर्णय वगळता एका विशिष्ट प्रकरणी नियम शिथिल करण्याचे अधिकार शासनास नाहीत (शासम सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अकंपा-१००३/प्र.क्र.५१/२००३/आठ, दि.२९/१०/२००३) त्यामुळे नियमात न बसणारे प्रकरण जिल्हाधिकारी / संचालनालय / शासनास पाठवू नयेत असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

३) दि.१०/३/१९९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना एकवेळची विशेष बाब म्हणून नगरपरिषद नियमित सेवेत (अस्थायी आस्थापनेवर) सामावून घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच नगरपरिषदांनी सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता न घेता केलेल्या कर्मचाऱ्यांच्या अनियमित नियुक्त्या नियमानुकुल करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अशा रोजंदारी /अनियमित कर्मचाऱ्यांना अनुकंपा नियुक्ति अनुज्ञेय नाही. याबाबत संचालनालय पत्र क्र.नप्रसई-१००४/प्र.क्र.१४/०४/५, दि.१६/२/२००४ सर्व नगरपरिषदांना कळविण्यात आलेले आहे.

४)	संचालनालय आदेश क्र.नप्रसई-१००१/प्र.क्र.१७३/०१/७, दि.३०/१२/२००२ अन्वये जिल्हाधिकारी यांना अनुकंपा नियुक्तिचे अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यानंतर, संचालनालय आदेश क्र.नपप्रसं-२००९/अनुकंपा/ प्र.क्र.९/कार्या-१५, दि.३१/१/२००९ अन्वये पूर्णत: मुख्याधिकारी / नगरपरिषद यांना देण्यात आलेले आहेत.

५)	संचालनालयाकडून विहीत केलेल्या धोरणानूसार आकृतिबंध मंजूर करतेवेळी नगरपरिषदेतील अस्थायी पदावर कार्यरत असणाऱ्या अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या स्थायी पदावर प्रथम वर्ग करावयाचे आहे. तसेच शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/ आठ, दि.२२/८/२००५ अन्वये प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५ % पदांवर अनुकंपा नियुक्ति द्यावयाची आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१००७/१२९५/प्र.क्र.१८१/०७/आठ, दि.२३/४/२००८ अन्वये दि.२२/८/२००५ पूर्वीच्या प्रतिक्षासुचीवरील अनुकंपा उमेदवारांसाठी प्रतीवर्षी रिक्त होणाऱ्या पदांपैकी ५ % पदांवर अनुकंपा नियुक्ति देण्याची अट रद्द करण्यात आली. तसेच दि.२२/८/२००५ पूर्वीच्या उमेदवारांना पहिल्या वर्षी - ५० %, दुसऱ्या वर्षी-२५% व तिसऱ्या वर्षी-२५% अनुकंपा नियुक्त्या देण्याचे धोरण शासनाने विहित केले. सदरील शासन निर्णयानूसार नगरपरिषद कर्मचाऱ्यांबाबत अंमलबजावणी करणे रिक्त पदांअभावी अशक्य होते. तथापि शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दि.२३/४/२००८ ची अंमलबजावणी होणे व नगरपरिषद अनुकंपा प्रतिक्षा सुचीतील उमेदवारांना जास्तीत जास्त नियुक्तिची संधी मिळावी या दृष्टीने संचालनालय आदेश क्र.नपप्रसं-२००९/अनुकंपा/प्र.क्र.९/कार्या-१५, दि.३१/१/२००९ अन्वये नगरपरिषदांचा आस्थापना खर्च विहित मर्यादेत असल्यास रिक्त होणाऱ्या अस्थायी पदांपैकी ५० % पदांवर ( रिक्त होणाऱ्या एका पदावर अनुकंपा नियुक्ति दिल्यास त्यापुढे रिक्त होणारे अस्थायी पद निष्काषित होईल.) अनुकंपा नियुक्ति देण्याची मुभा नगरपरिषदांना देण्यात आलेली आहे.

७)	शासन नगर विकास विभाग पत्र क्र.नपप्रसं-२०१०/७४/प्र.क्र.२१/१०/नवि-१४, दि.३०/६/२०१० अन्वये नगरपरिषद मंजूर आकृतिबंधतील रिक्त होणाऱ्या स्थायी पदावर अनुकंपा नियुक्ति करण्यासाठी यापूर्वी लागू असलेली आस्थापना खर्चाची अट शासनाकडून शिथिल करण्यात आल्यामुळे, संचालनालय पत्र क्र.नपप्रसं-कक्ष७(१५)/सर्वनप/अनुकंपा/२०१०, दि.१५/७/२०१० अन्वये त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे सर्व नगरपरिषदांना सुचित करण्यात आले आहे.

८)	शासन नगर विकास विभाग पत्र क्र.एमसीओ-१२११/प्र.क्र.८२/नवि-१४, दि.२/१/२०१२ अन्वये शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय दि.६/१२/२०१० च्या अनुषंगाने दि.६/१०/२०१० पासून अनुकंपा नियुक्तिसाठी ४० वर्ष ही वयोमर्यादा ४५ वर्ष करण्यात आल्यानूसार संचालनालय पत्र क्र.नपप्रसं-कक्ष७/अनुकंपा-कॉमन/२०१२, दि.७/२/२०१२ अन्वये कार्यवाही करण्याचे सर्व नगरपरिषदांना सुचित करण्यात आले आहे.

९)	यापूर्वी अनुकंपा नियुक्ती प्रचलित नियमानूसार पती, पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी, मृत्युपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा, दत्तक घेतलेली अविवाहीत मुलगी, अन्य कोणी वारस पात्र नसल्यास सून, मृत अविवाहीत शासकीय कर्मचाऱ्याबाबत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबीत भाउ किंवा अविवाहीत बहीण, घटस्फोटीत-विधवा मुलगी / बहीण हे अनुकंपा नियुक्तिसाठी पात्र होते.

शासन सामान्य प्रशासन निर्णय क्र.अकंपा-१०१३/प्र.क्र.८/आठ, दि.२६/२/२०१३ अन्वये उपरोक्त पात्र वारसांसह आता दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबात फक्त विवाहीत मुलगी हे एकमेव अपत्य असल्यास किंवा त्याचे कुटुंब विवाहीत मुलीवर अवलंबून असल्यास विवाहीत मुलगी व पतीकडून कुटुंबाचा सांभाळ करण्यासंबंधीची प्रतिज्ञापत्र व हमी पत्र स्टॅम्प पेपरवर सादर केल्यास अनुकंपा नियुक्ति अनुज्ञेय आहे. तसेच अनुकंपा नियुक्तीनंतर कुटुंबाचा सांभाळ करीत नसल्याचे आढळल्यास शासन सेवा तात्काळ समाप्त करण्याचे निदेशीत करण्यात आले आहे.

**(१.१९) दुहेरी लेखा पध्दत (Double Entry) - शासन, नगर विकास विभाग निर्णय क्र.लेसुक-१०२००३ /प्र.क्र.८७ /२००३ /नवि-१६, दि.१२.११.२००३ अन्वये मंजूर करण्यात आलेली पदे**

| **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **पद संख्या** | **कार्यरत असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांचे नाव** |
|---|---|---|---|
| वित्तीय सल्लागार | १६४५०-४५०-२०००० | १ | श्री.अनुदीप दिघे- वित्तीय नियंत्रक, वित्तीय सल्लागार - (अतिरीक्त कार्यभार) |
| प्रकल्प समन्वयक | ६५००-२००-१०५०० | १ | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक प्रकल्प समन्वयक |
| संगणक लिपिक | मानधनावर | १ | --- |
| | **एकूण** | **३** | |

## (१.२०) राज्यातील महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये A ccrual Based Double Entry System लागू करणेबाबत -

***१. Para No. २(a )Progress of implementation of A ccrual Based A ccounting System in ULBs. How many ULBs have switched over to A ccrual Based***
***A ccounting System.***

- राज्य विर्निदिष्ट लेखा संहितेच्या अंतिम ७९० प्रती छापून संचालनालयास प्राप्त झाल्या आहेत. सदर प्रतीचे वाटप नगरपरिषदांना प्रत्येकी एक प्रत असे वाटप करण्यात आले आहे.
- राज्यातील सर्व नगरपरिषदांनी लेख्याची नोंद दि. १.४.२०११ रोजी पासून.दुहेरी नोंद लेखा पध्दतीमध्ये घेण्याचे सुरू केले असल्याचे प्रमाणपत्र या संचालनालयास सादर केलेली आहेत.
- महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता -२०१३ ची अंमलबजावणी कशी करावी व त्याप्रमाणे लेखे कसे ठेवण्यात यावे. तसेच आजपर्यंत केलेल्या दुहेरी नोंद लेखा पध्दतीच्या अंमलबजावणीचा आढावा याबाबत संचालनालयाने विभागीय स्तरावर प्रशिक्षण/आढावा दि.२३.०८.२०१३ पासून सुरु करण्यात आला होता
- राज्यातील २३८ नगरपरिषदांमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करण्यासाठी नगरपरिषदा व नगरपंचायतीचे ४४ Cluster मध्ये विभागणी करुन Cluster निहाय सनदी लेखापालाच्या निविदा पध्दतीने नियुक्त्या करण्याचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे.
- राज्य स्तरावर PMC (CA) नेमण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

## (१.२१) संगणकीकरण : -

नगर विकास विभाग शासन निर्णय दिनांक २८ जुलै २००९ अन्वये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने विकसीत केलेल्या संगणक प्रणालीची अंमलबजावणी राज्यातील सर्व ड-वर्ग महानगरपालिका (जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानात समाविष्ट महानगरपालिका वगळून), नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत शासन निर्णय दिनांक १८.१०.२००५ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) म्हणून आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांची नियुक्ती केलेली आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु.१०७,४९,८७,९०४/- इतका असून शासनाचा भार रु.९२,८६,४०,७४७/- इतका आहे.

शासन निर्णय दिनांक २८.७.२००९ अन्वये संगणक प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी वित्तीय आकृतीबंधास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे. सदर संगणकीकरणाच्या संभाव्य खर्चामध्ये संगणक प्रणालीचा किंमत, हार्डवेअर, सी.एफ.सी., सर्व्हर रुम, डेटा एन्टी, प्रशिक्षण यांचा खर्च समाविष्ट आहे.

शासन निर्णय दिनांक ३०.५.२००५ अन्वये सदर प्रकल्पांतर्गत कार्यक्रम व्यवस्थापक (Programme Manager) म्हणून Price water house coppers pvt.ltd. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पात एकूण २३१ मनपा/नपाचा समावेश असून प्रकल्पांतर्गत महानगरपालिका/ नगरपरिषदांना संगणकीकरणासाठी आवश्यक असलेल्या हार्डवेअरचा पुरवठा संचालनालयाकडून करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पातर्गत महानपा/नपाच्या कर्मचा-यांना यशदा संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सदर प्रकल्पासाठी सी.एफ.सी. व सर्व्हर रुम तयार करणे, लॅन तयार करणे, डेटा एन्टी करणे, एसी व जनरेटर खरेदी करणे इ. कामे मनपा/नपांनी त्यांचे स्तरावर करावयाची आहेत. अ व ब वर्ग नगरपरिषदांनी ऑनलाईन व ऑफलाईन युपीएसची खरेदी त्यांच्या स्तरावर करावयाची आहेत.

सदर प्रकल्पांतर्गत एबीएम कंपनीमार्फत सॉफटवेअरचा पुरवठा करण्यात आला असून खाली नमुद केलेले मॉडयूल्स मनपा/नपांना पुरविण्यात आले आहेत.

१. MAINet Birth & Death
२. MAINet Assessment
३. MAINet Water Billing & Accounting
४. MAINet Marriage Registration

५. MAINet Market License
६. MAINet Accounts
७. MAINet CARE (Compliants & Grievance Redressal Management)
८. MAINet UWMS(User Workflow Management System)
९. MAINet EIP (Enterprise Information Portal)- with services as operational at KDMC
१०. MAINet CFC(Citizen Facilitation Centre)
११. MAINet Town Planning(४ Services as operational in KDMC

**(१.२२) G.I.S. प्रणाली -**

राज्यातील नागरी स्थानीक स्वराज्य संस्थांचे नकाशे डिजिटाईस्ड करुन MRSAC या संस्थे मार्फत G.I.S. आज्ञावली विकसीत करण्यासाठी शासनाने मंजूर केलेला निधी MRSAC या संस्थेस वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच राज्यातील एकूण ६१ नगरपरिषदांचे नगर भूमापन (सिटी सर्व्हे ) झालेले नाहीत. त्याबाबत सदर नगरपरिषदांचे भूमापन होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले आहे. १२ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून रक्कम रु.२५.०० कोटी राखीव ठेवण्यात आले असून जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून सदर काम करण्यात येत आहे. या कामाकरीता सर्व विभागीय आयुक्त कार्यालयास रु.१९.०० कोटी वितरीत करण्यात आलेले आहे. जमाबंदी आयुक्त पुणे व MRSAC नागपूर यांचे मार्फत नगरपालिका /महानगरपालिकांचे डेटाबेस तयार करण्याचे काम सुरु आहे.

**(१.२३) २० कलमी कार्यक्रम -**

राज्यातील नगरपरिषदांचा सर्व व्यापक विकास होण्यासाठी ज्या नगरपरिषदा मालमत्ता कर, पाणी कर वसुल करणे, उद्योगधंदे आकषिर्त करणे, प्रशासन लोकाभिमुख व गतीमान करणेसाठी प्रयत्नशील राहातील त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी या संचालनालयाने नगरपरिषदांसाठी २० कलमी कार्यक्रम विहित केला आहे. या अंतर्गत नगरपरिषदांच्या कामगिरीचे मुल्यमापन करुन प्रतवारी करण्यासाठी एकूण २००० गुण विहित करण्यात आले आहेत. याकार्यक्रमांतर्गत विभगनिहाय माहितीचे संकलन व गुणानुक्रमे नगरपरिषदोची प्रतवारी विभीगीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांचे कार्यालयाकडून करण्यात येते. नगरपरिषदेने केलेल्या कामगिरीची विभागीय स्तरावर आयुक्त कार्यालयात त्रैमासिक आढावा बैठकीमध्ये विभागातील अव्वल स्तरावरील तीन नगरपरिषदांचे अभिनंदन करुन अधिक काम चांगले करण्याबाबत मार्गदर्शन केले जाते. याशिवाय निम्न स्तरावरील तीन नगरपरिषदांच्या कामगिरीमध्ये सुधारणा करणेबाबत सहाय्यक प्रादेशिक संचालकांना निरिक्षण अधिकारी नेमून व आवश्यक त्या सूचना करुन सुधारणा घडवून आणली जाते.

**(१.२४) नगरपरिषद कामकाज आढावा विभागीय स्तरावरील बैठका -**

नगरपरिषद क्षेत्रातील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मा.आयुक्त तथा संचालक हे प्रशासकीय सोयीनुसार नगरपरिषदांच्या कामकाजाचा आढावा बैठका घेतात. कामकाजात प्रगती होण्यासाठी सहाय्यक प्रादेशिक संचालक, जिल्हा प्रशासन अधिकारी व मुख्याधिकारी यांना शासनाच्या महत्वाच्या मुख्य बाबींवर लक्ष केंद्री करण्याबाबत सूचना देतात.

**महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ नूसार नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून नगरपरिषदांच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे कामकाज पार पाडले जाते.**

## परिशिष्ट - अ

| कार्यासन क्र. | अधिकारी यांचे नाव व पदनाम | कार्यासनात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम अधिकारी / कर्मचारी यांचे नाव |
|---|---|---|
| १ | श्री.विरेन्द्र सिंह, भा.प्र.से.<br>आयुक्त तथा संचालक - नगरपरिषद प्रशासन संचालनालय | श्रीमती स्मितप्रभा शिंदे, लघुलेखक (मराठी), आयुक्त तथा संचालक यांचे स्वीय सहाय्यक<br>श्रीमती अनिता तरे, लघुटंकलेखक, आयुक्त तथा संचालक यांचे स्वीय सहाय्यक<br>श्रीमती ज्योती शिंदे, आयुक्त तथा संचालक लघुलेखक (इंग्रजी)<br>श्री.उमाशंकर पासी, वाहनचालक<br>श्री.मा.मु.फड, दप्तरी |

| | | |
|---|---|---|
| २ | उप संचालक (१)<br>श्री.अनिल मुळे, उप संचालक | श्रीमती मानसी सोहनी अधिक्षक<br>(माहिती अधिकारांतर्गत अपिले)<br>श्री.र.ना.पवार, नाईक / श्री.लोकबहादुर गुरुंग, शिपाई |
| २ | श्री.संतोष देहेरकर, उप संचालक (२) | श्री.र.ना.पवार, नाईक / श्री.लोकबहादुर गुरुंग, शिपाई |
| २ | श्री.अनुदीप दिघे, वित्तीय नियंत्रक | श्री.र.ना.पवार, नाईक / श्री.लोकबहादुर गुरुंग, शिपाई |
| २ | श्री.अशोक बागेश्वर, उप संचालक<br>(सद्यस्थितीत निलंबित) | ----- |
| ३ | श्री.प्रमोद पाटील-सहा.संचालक-लेखा परिक्षक | ----- |
| ४ | श्री.राजेंद्र शिंदे, सहाय्यक संचालक (आस्था.) | श्री.रत्नदीप कीर, अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.बाळाराम रातांबे, लिपिक टंकलेखक |
| | | श्री.संतोष सावंत, लिपिक-टंकलेखक (नोंदणी शाखा)<br>श्री.लोकबहादुर गुरुंग, शिपाई (हस्तबटवडा) |
| | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक (DDO) | श्री.अविनाश कुटे- लिपिक-टंकलेखक- (रोखपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार)<br>श्री.निनाद पाचाडकर, शिपाई (रोखशाखा)<br>श्री.योगेश माने, सहाय्यक (रोखपाल) (सद्यस्थितीत निलंबित) |
| ५ | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक - | (रिक्त) अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.पराग केणी, लिपिक-टंकलेखक |
| ६ | श्री.संजय गायकवाड, सहाय्यक संचालक - | (रिक्त) अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.अमित मांडवकर, लिपिक-टंकलेखक<br>श्री.भगवान बंगे, लिपिक-टंकलेखक |
| ७ | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक | (रिक्त) अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.अजय आव्हाड, लिपिक-टंकलेखक |
| ८ | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक | (रिक्त), अधिक्षक<br>श्रीमती विद्या येरुणकर- अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.सिताराम गायकवाड, लिपिक-टंकलेखक |
| ९ | श्री.राजेंद्र शिंदे, सहाय्यक संचालक | श्रीमती मानसी सोहनी, अधिक्षक<br>(रिक्त) सहाय्यक<br>श्री.यशवंत पोळ, लघुलेखक (टंकलेखनासाठी) |
| १० | श्री.अभिषेक पराडकर, सहाय्यक संचालक | श्रीमती हिना राठोड, अधिक्षक<br>(रिक्त), सहाय्यक<br>श्री.संजय राऊत, लिपिक-टंकलेखक |
| १२ | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक | श्री.निशिकांत गवई, अधिक्षक<br>(रिक्त) सहाय्यक<br>(रिक्त) लिपिक-टंकलेखक |
| १३ | श्री.एस.एम.अली, सहाय्यक संचालक वर्ग-१<br>श्री.एल.पी.शर्मा- उप अभियंता<br>श्री.जी.एस.कुंभार- कनिष्ठ अभियंता | श्री.महेश चौधरी, अधिक्षक<br>(रिक्त) सहाय्यक<br>श्री.अविनाश कुटे, लिपिक-टंकलेखक |
| १६ | (रिक्त), सहाय्यक संचालक<br>(रिक्त), लेखाधिकारी | श्रीमती मानसी सोहनी, अधिक्षक<br>श्री.संजय सोनावणे, सहाय्यक<br>(रिक्त), सांख्यिकी सहाय्यक<br>श्री.अनिकेत धोपट, लिपिक-टंकलेखक |

| | | |
|---|---|---|
| CMAM | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक - प्रकल्प समन्वयक (अतिरीक्त कार्यभार) | श्री.अनिकेत धोपट, लिपिक-टंकलेखक - अतिरीक्त कार्यभार |
| लेखा सुधारणा कक्ष | श्री.अनुदीप दिघे- उप संचालक, वित्तीय सल्लागार - (अतिरीक्त कार्यभार)<br>श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक<br>प्रकल्प समन्वयक | (रिक्त) - संगणक लिपिक (मानधनावर) |
| SECC | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक | श्री.यशवंत पोळ, लघुलेखक |

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीसाठी अपिलीय अधिकारी व शासकीय माहिती अधिकारी खालील प्रमाणे**

| कार्यासन क्रमांक | अपिलीय अधिकारी | कॉलम क्र.२ मधील अपिलीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत प्रभारी अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| सर्व | श्री.अनिल मुळे, उप संचालक | श्री.संतोष देहेरकर, उप संचालक |
| | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक तथा समन्वय अधिकारी | |

| कार्यासन क्रमांक | शासकीय माहिती अधिकारी |
|---|---|
| (१) | (२) |
| ४ | श्री.राजेंद्र शिंदे, सहाय्यक संचालक |
| ५ | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक |
| ६ | श्री.संजय गायकवाड, सहाय्यक संचालक |
| ७ | १) श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक (नगरपरिषद कर्मचारी,अनुकंपा व इतर)<br>२) श्री.अभिषेक पराडकर,सहाय्यक संचालक (E-Governence-न.प.अंमलबजावणी) |
| ८ | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक |
| ९ | श्री.राजेंद्र शिंदे, सहाय्यक संचालक |
| १० | श्री.अभिषेक पराडकर, सहाय्यक संचालक |
| १२ | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक |
| १३ | श्री.एस.एम.अली, सहाय्यक संचालक |
| १६ | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक (NULM व सामाजिक जात सर्वेक्षण-SECC) |
| CMAM | श्री.शाम पोशेट्टी, सहाय्यक संचालक |
| दुहेरी लेखा सुधारणा कक्ष | श्री.रा.ग.वायचळ, सहाय्यक संचालक |

ज्या दिवशी कार्यासनाचे शासकीय माहिती अधिकारी / प्रभारी शासकीय माहिती अधिकारी अर्धा दिवसही अनुपस्थित असतील तर उपस्थित असलेल्या इतर कोणतेही शासकीय माहिती अधिकारी यांनी काम पाहणे बंधनकारक राहील.

## नगरपरिषद प्रशासन संचालनालय - कामकाज वाटप

| अ.क्र | नियंत्रक / पर्यवेक्षीय अधिकारी - नाव / पदनाम | कार्यरत अधिकारी / कर्मचारी - नाव / पदनाम | कार्यासन क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री.संतोष देहेरकर -<br>उप संचालक | **१) का.क्र.५-**<br>१)सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी<br>२) अधिक्षक - **रिक्त**<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - श्री.पराग केणी | **१) का.क्र.५-**<br>**मुख्याधिकारी आस्थापना-आस्थापनाविषयक कामकाज/ मुख्याधिकाऱ्याविरुध्द -तक्रार /विभागीय चौकशी-** |
| | | **२) का.क्र.७**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी<br>२) सहाय्यक संचालक - श्री.अभिषेक पराडकर<br>( **e- governance साठी**)<br>३) अधिक्षक - **रिक्त**<br>४) सहाय्यक - **रिक्त**<br>५) लिपिक-टंकलेखक - श्री.अजय आव्हाड | **२) का.क्र.७ -**<br>**अ) नप सेनि कर्मचारी, अनुकंपा व इतर अनुषांगीक बाबी**<br>**ब) राज्यातील नगरपरिषदांमध्ये e- Governance प्रकल्प राबविणे-** |
| | | **३) का.क्र.१६**<br>१) सहाय्यक संचालक - **रिक्त**<br>२) लेखाधिकारी - **रिक्त**<br>३) अधिक्षक - **रिक्त**<br>४) सहाय्यक - **रिक्त**<br>५) सांख्यिकी सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - श्री.अनिकेत धोपट<br>तांत्रिक विशेषज्ञ - राज्य अभियान व्यवस्थापक (करार तत्वावरील)<br>१) सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी - श्री प्रसाद राजेभोसले<br>२) कौशल्य प्रशिक्षण व रोजगार उपलब्धता - श्री अनिल इंगुलकर<br>३) नागरी फेरीवाल्यांना सहाय्य आणि नागरी बेघरांसाठी निवारा - श्री गजानन जगते<br>४) माहिती सनियंत्रण व मूल्यांकन - श्री रवींद्र सावंत<br>५) वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय - **रिक्त**<br>६) क्षमता बांधणी व प्रशिक्षण (HR) - **रिक्त** | **३) का.क्र.१६- NULM -**<br>**दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय व राज्य नागरी उपजीविका अभियान अभियानाची मुख्य उद्दिष्टे :**<br>१) नागरी गरीब लोक, त्यांच्या संस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्र निर्मुलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे,<br>२) नागरी गरीब कुंटुंबातील व्यक्तींना उपजविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे,<br>३) बाजाराच्या औद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनूसार, विविध क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेउन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देउन त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.<br>४) नागरी गरीबांच्या लघुउद्योगांना चालना देणे.<br>५) नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मूलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे.<br>६) नागरी फेरीवाल्यांच्या उपजविकेच्या समस्या सोडून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **अभियानाचे प्रमुख घटक**<br>**१) सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी**<br>१) स्वयंसहाय्य समूहांची /बचत गटांची स्थापना करणे<br>२) बचत गटांच्या वस्ती स्थरीय व शहर स्थरीय संघाची स्थापना करणे<br>३) सर्वसमावेशक वित्तीय समावेशान राबविणे<br>४) शहरी उपजीविका केंद्राची उभारणी करणे (City Livelihood Centre)<br>५) बचत गटांचीविविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता बांधणी करणे<br>६) संसाधन संस्थेची निवड करणे.<br>७) बचत गट व वस्ती स्थरीय संघ यांना फिरता निधी देणे.<br>**२) कौशल्य प्रशिक्षण व रोजगार उपलब्धता**<br>१) कौशल्य प्रशिक्षणासाठी लाभार्थी निवड करणे<br>२) कौशल्य प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण संस्थांची निवड करणे<br>३) प्रशिक्षित लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देणे.<br>**३) नागरी फेरीवाल्यांना सहाय्य आणि नागरी बेघरांसाठी**<br>१) शहरी फेरीवाल्यांच सर्वेक्षण, विक्री साठी नागरी नियोजन, फेरीवाल्यांचा कार्यकौशल्य विकास व प्रशिक्षण,<br>२) फेरीवाल्यांसाठी वित्तीय समावेशन<br>३) नागरी बेघरांना निवारा उपलब्ध करून देणे<br>४) नवीन निवारा बांधकाम DPR मागविणे व त्यासाठी सहाय्य करणे<br>५) उपलब्ध निवारयांना देखभाल व व्यवस्थापन निधी उपलब्ध करून देणे.<br>६) निवारयातील लाभार्थ्यांचे सक्षमीकरण करणे<br>**४) वित्तीय समावेशन व लघुव्यवसाय**<br>१) स्वयंरोजगार पतपुरवठा व सहाय्य<br>२) बचत गट पतपुरवठा व सहाय्य<br>३) सामुहिक व्यवसाय गट पतपुरवठा सहाय्य<br>४) नागरी स्थरावर टास्क फोर्स समिती स्थापना करणे<br>५) व्याजावरील अनुदान योजना राबविणे<br>**५) माहिती सनियंत्रण व मूल्यांकन**<br>१) माहिती सानियंत्रित करणे<br>२) MIS Portal वर अचूक व वेळेवर माहिती भरण्यासाठी वेळोवेळी तांत्रिक सहाय्य करणे.<br>३) माहितीचे मूल्यांकन करणे.<br>४) MIS बाबत प्रशिक्षण घेणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **६) क्षमता बांधणी व प्रशिक्षण (HR)**<br>१) राज्य अभियान कक्ष व शहर अभियान कक्षाची स्थापना<br>२) तांत्रिक तज्ञ यांना अभियानाबाबत विविध स्थरावर सहाय्य<br>३) प्रशिक्षण व क्षमता बांधणी करणे<br>४) प्रशिक्षण संस्थेची निवड करणे<br>५)अभियानातील स्टाफ चे कार्य मूल्यमापन करणे |
| | | **४) SECC**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.रा.ग.वायचळ<br>२) लघुलेखक-मराठी - श्री.य.स.पोळ | **४) सामाजिक जात सर्वेक्षण (SECC)**<br>१) राज्यातील सर्व शहरी विभागातील सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण २०११ च्या कामावर नियत्रण ठेवणे.<br>२) पत्रव्यवहार<br>३) PIL २०,३०,४० /२०१० चा पत्रव्यवहार |
| २ | श्री.अनिल मुळे -<br>उप संचालक | **१) का.क्र.२-**<br>श्रीमती मानसी सोहनी-अधिक्षक | **१) का.क्र.२-**<br>**केंद्रीय माहिती अधिकार २००५ अंतर्गत अपिल (प्रथम अपिलीय अधिकारी)** |
| | | **२) का.क्र.४-**<br>**अ) कार्यालयीन आस्थापना**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.राजेंद्र शिंदे -<br>२) अधिक्षक - श्री.रत्नदीप कीर<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक- श्री.बाळाराम रातांबे | **२) का.क्र.४-**<br>**१) संचालनालयातील आस्थापना विषयक सर्व कामकाज**<br>**२) कार्यालयीन व्यवस्थापनविषयक सर्व कामकाज** |
| | श्री.अनिल मुळे -<br>उप संचालक - (पर्यवेक्षीय अधिकारी) | **ब) रोखशाखा**<br>१) DDO- श्री.रा.ग.वायचळ (अति.कार्यभार)<br>२)रोखपाल- श्री.अविनाश कुटे-लिपिक-टंकलेखक(अति.कार्यभार)<br>३) लेखा लिपिक - **रिक्त** | **ब) रोखशाखेशी संबंधीत सर्व कामकाज.** |
| | | **क) नोंदणी शाखा - आवक/जावक -**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.राजेंद्र शिंदे<br>२) लिपिक-टंकलेखक - श्री.संतोष सावंत | **नोंदणी शाखा - आवक /जावक कामकाज** |
| | | **३) का.क्र.८**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.रा.ग.वायचळ-<br>२) अधिक्षक - श्रीमती विद्या येरुणकर<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४)लिपिक-टंकलेखक - श्री.सिताराम गायकवाड | **३) का.क्र.८-**<br>**अनुदाने वितरण व इतर अनुषांगीक कामे** |
| | | **४) का.क्र.९**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.राजेंद्र शिंदे<br>२) सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी | **४) कार्यासन क्र.९**<br>**राज्यातील सर्व नगरपरिषदांमधील गैरव्यवहार, लोक प्रतिनिधी, मुख्याधिकारी, कर्मचाऱ्यांविरुध्दच्या तक्रारीबाबतचे कामकाज** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (विधानमंडळ तारांकीत/अतारांकीत प्रश्न समन्वय कामकाजासाठी)<br>२) अधिक्षक - श्रीमती मानसी सोहनी<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक- श्री.य.स.पोळ-(लघुलेखक-टंकलेखनासाठी मदतनीस) | |
| | | **५) का.क्र.१०**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी<br>२) अधिक्षक - श्रीमती हिना राठोड<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - श्री.संजय राऊत | **५) का.क्र.१०**<br>१) **बांधा - वापरा - हस्तांतरण (B.O.T. ) करा विषयक प्रकरणे**<br>२) **मालमत्ता भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्याविषयक प्रकरणे**<br>३) **मालमत्ताकर व पाणीपट्टी**<br>४) **रस्ते विषयक माहिती संकलन**<br>५) **राज्यातील नगरपरिषदांमध्ये Geographical Information**<br>६) **स्वच्छ भारत अभियानसंदर्भात अनुषंगिक कामे** |
| | | **६) का.क्र.१३**<br>१) सहाय्यक संचालक-वर्ग-१- श्री.एस.एम.अली<br>२) अधिक्षक - श्री.महेश चौधरी<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - श्री.अविनाश कुटे<br>५) उप अभियंता- -पापु- श्री.एल.पी.शर्मा<br>६) कनिष्ठ अभि. -पापु- श्री.जी.एस.कुंभार | **६) का.क्र.१३-**<br>**UIDSSMT, नगरोत्थान, घनकचरा व्यवस्थापन**<br>१) **UIDSSMT**<br>२) **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान**<br>३) **घनकचरा व्यवस्थापन**<br>४) **कत्तलखाने विषयक बाबी** |
| | | ------ | **७) अ)का.क्र.५ कडील - मुख्याधिकारी संवर्ग आस्थापना - प्रशिक्षण**<br>**ब) का.क्र.६ कडील नगरपरिषद संवर्ग कर्मचारी आस्थापना - प्रशिक्षण** |
| | | ------ | **८) का.क्र.७ कडील- ई-गव्हर्नन्सचे कामकाज.** |
| | | १) सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी | **९) CMAM** |
| | श्री.अनुदीप दिघे -<br>वित्तीय नियंत्रक -<br>(उप संचालक) | **१) लेखा सुधारणा कक्ष**<br>१) प्रकल्प समन्वयक - श्री.रा.ग.वायचळ (सहाय्यक संचालक)<br>२) संगणक सहाय्यक (मानधनावर) - **रिक्त** | **१) लेखा सुधारणा कक्ष -**<br>**राज्यातील २३७ नगर परिषद / नगर पंचायतीमध्ये उपार्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणे** |
| | | **२) सर्व कार्यासन** | **२) कार्यालयीन सर्व वित्तीय बाबी -** |
| | | **३) सर्व कार्यासन** | **३) कार्यालयीन लेखा परीक्षण व नगरपरिषद-लेखा परीक्षण -** |
| | | **४) सर्व कार्यासन** | **४) समन्वय - न्यायालयीन प्रकरणे / लोक आयुक्त-उप लोआ प्रकरणे / विधान मंडळ प्रश्न** |
| | | **१) का.क्र.१२**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.शाम पोशेट्टी<br>२) अधिक्षक - श्री.निशिकांत गवई<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - **रिक्त** | **५) का.क्र.१२- संकीर्ण, अनधिकृत बांधकाम व इतर -**<br>१) नगरपालिका बांधकामे व अनधिकृत बांधकामे<br>२) नगरपरिषद तपासणी / लेखा परिक्षण<br>३) नगरपरिषद सनियंत्रण<br>४) नगरपरिषद पर्यवेक्षण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ५) नगरपरिषद अंदाजपत्रक आणि लेखे<br>६) शासकीय गृहनिर्माण योजना (IHSDP)<br>७) प्राथमिक शिक्षण<br>८) आरोग्य सेवा<br>९) संकिर्ण बाबी |
| | | **६) का.क्र.६**<br>१) संचालक- श्री.संजय गायकवाड<br>२) अधिक्षक - **रिक्त**<br>३) सहाय्यक - **रिक्त**<br>४) लिपिक-टंकलेखक - श्री.अमित मांडवकर (नगरपरिषद आकृतिबंध, वेतनश्रेणी इत्यादी)<br>५) लिपिक-टंकलेखक - श्री.भगवान बंगे (नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग आस्थापना) | **६) का.क्र.६-**<br>**अ) नगरपरिषद आस्थापना**<br>१) नगरपरिषदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करणे व आदेश निर्गमित करणे.<br>२) सफाई कर्मचाऱ्यांच्या लाड कमिटी/ वारसा पध्दतीने नियुक्त्या करणे संदर्भात मार्गदर्शन व तक्रारीचे निवारण करणे.<br>३) नगरपरिषद आस्थापनेवरील अनियमित नेमणूकांबाबत मार्गदर्शन करणे.<br>४) नगरपरिषद आस्थापनेवरील रोजंदारी नमणूकांबाबत मार्गदर्शन करणे.<br>५) नगरपरिषद सेवेत भरती व वेतनश्रेणी बाबत सर्व न्यायालयीन व लोकआयुक्त प्रकरणे.<br>**ब) राज्यस्तरीय संवर्ग आस्थापना**<br>१) राज्यस्तरीय संवर्ग आकृतीबंध .<br>२) समावेशन प्रक्रिया व अनुषंगिक कामे.<br>३) समावेशन रद्द करणेबाबत.<br>४) संवर्गातील सरळसेवा भरती.<br>५) संवर्गातील पदोन्नतीने भरती.<br>६) संवर्ग आस्थापना विषयक इतर कामे.<br>७) संवर्गातील कर्मचारी बदल्या.<br>८) प्रशिक्षण व त्यासंबंधित कार्यवाही. |
| | ------ | **का. क्र.३**<br>१) सहाय्यक संचालक - श्री.रा.ग.वायचळ (समन्वय अधिकारी)<br>२) श्री.य.स.पोळ- लघुलेखक | **१) का.क्र.३-**<br>**केंद्रीय माहिती अधिकार २००५ अंतर्गत अर्ज (समन्वय अधिकारी)** |
| | ------ | श्री.प्रमोद पाटील - सहाय्यक संचालक-लेखा परिक्षक | ------ |
| | **बाहययंत्रणेव्दारे ७ लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांपैकी -**<br>**१) श्री.आशिष पाटील - का.क्र.६ मध्ये मदतनीस**<br>**२) श्री.विजय गडदे - दुहेरी नोंद लेखा सुधारणा कक्ष मदतनीस.**<br>**३) श्रीमती किशोरी कोळी - का.क्र.१३ मध्ये मदतनीस.**<br>**४) श्रीमती अक्षता कदम - नोंदणी शाखेत मदतनीस आवश्यकतेनूसार कामकाज सोपविले जाते.**<br>**५) श्रीमती अर्चना शिंदे - आवश्यकतेनूसार कामकाज सोपविले जाते**<br>**६) श्रीमती विशाखा राणे -आवश्यकतेनूसार कामकाज सोपविले जाते.**<br>**७) श्री.मयुरेश राणे - नगर विकास विभाग- मंत्रालय येथे कामकाजासाठी पाठविण्यात आले आहे.** | | |